**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.२, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी डी. बी. साठे)**

<table>
<tr><td rowspan="5">MHKO050012142023</td><td rowspan="2">संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६११/२०२३ नि.१० लगत</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">२१/०३/२०२३</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">२९/०३/२०२३</td></tr>
<tr><td rowspan="3">महाराष्ट सरकार<br>विरुद्ध<br>आकाश होगाडे व इतर</td><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०२/०७/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०३</td><td>०३</td><td>११</td></tr>
</table>

**:- न्यायनिर्णय -:-**
**(अधिघोषीत दि.०२/०७/२०२६)**

**१.** अभियोगपक्षाने आरोपींच्या विरुध्द मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) या गुन्ह्याबाबत प्रकरण चालविले आहे.

**२.** प्रस्तुत प्रकरणाचे कामी आरोपीचे विरुध्द मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.१० कडे नोंदविला व त्यांना समजणा-या भाषेत वाचुन दाखविला व समजावुन सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

**३.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांची साक्ष नोंदविली आहे. मी नि.१ खाली आदेश करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरुध्द सबळ पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

**४.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केलेले आहेत. सदरचे मुद्दे, कारणमिमांसा व निष्कर्षासह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | आरोपी दि.१८/११/२०२२ रोजी १५.०० वाजताचे सुमारास अनिकेत पानशॉपचे समोर रोडवर, इचलकरंजी येथे आरोपी हे बिगरपरवाना, बेकायदेशीरपणे जुगार खेळताना व खेळवित असताना मिळून आल्याचे,अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| २) | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ बाबतः–**

**५.** मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियमाचे कलम १२अ नुसार ज्या व्यक्तीस पकडले आहे किंवा ज्या व्यक्तीची झडती घेतली आहे ती व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष जुगार खेळत असताना मिळून आल्याचे शाबित केल्याशिवाय शिक्षेस पात्र होवू शकत नाही. साक्षीदार क्र.१ सर्जेराव तुकाराम कळंत्रे याने त्याच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दि.१८/११/२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरिता बोलाविले नव्हते. पोलिसांच्या सांगण्यावरून त्यांनी एका को–या कागदावर त्यांची स्वाक्षरी केली होती. सदर साक्षीदाराने त्याची सही ओळखली पण मजकूराबाबत त्याला काहीही माहिती नाही. प्रस्तुत साक्षीदार अभियोग पक्षास मदत करत नसल्याने अभियोगपक्षामार्फत त्यास सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु अभियोगपक्षास मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. इतर साक्षीदारांना वेळोवेळी समन्स काढून देखील हजर न राहिल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**६.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या जप्ती पंच यांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे आरोपीच्याच ताब्यातून घटनास्थळी कागदी चिठ्ठया, पेन व रोख रक्कम रु.७३०/– जप्त केल्याचे व तसा

पंचनामा घटनास्थळी तयार केल्याचे अभियोगपक्ष संशयापलिकडे सिध्द करु शकला नाही. त्यामुळे साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करता आरोपीच्या ताब्यातुन मुद्देमाल जप्त झाल्याचे सिध्द होत नाही. तसेच अभियोगपक्षाने जप्त मुद्देमाल पटलावर आणलेला नाही. त्यामुळे आरोपी याच्याकडुन जप्त केलेला तथाकथित मुद्देमाल हा जुगार घेण्यासाठी वापरला होता हे अभियोगपक्षाने स्पष्टपणे शाबित केलेले नाही. तसेच अभियोगपक्षाने आपला खटला शाबीत करण्याकरीता फिर्यादी साक्षीदाराची साक्ष नोंदवली नाही व कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नोंदविलेला नाही. वरील पुराव्याच्या विवेचनाचा एकंदरीत विचार करता अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा विषयांकित गुन्हा रास्त शंकेपलीकडे जाऊन शाबित केलेला नाही. आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळत होता व त्याने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमचे कलम १२–अ नुसार गुन्हा केला आहे असे अभियोगपक्ष ठोस पुराव्यानिशी शाबित करु शकलेला नाही. त्यामुळे सदर आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवतो. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल कागदी चिठ्ठी, निळा बॉलपेन हे मूल्यहीन असुन ते अपिल कालावधीनंतर नाश करणे उचित होईल. रोख रक्कम रु.७३०/– याची कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे अपिल कालावधीनंतर रोख रक्कम रु.७३०/– सरकारजमा करणे उचित होईल. म्हणुन मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) या गुन्ह्याचे आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तीक जात मुचलके आणि जामिन कतबे रद्द करण्यात येतात.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल कागदी चिठ्ठी, निळा बॉलपेन हा मुद्देमाल मूल्यहीन असल्याने तो अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा. तसेच अपिल कालावधीनंतर रोख रक्कम रु.७३०/–सरकारजमा करणेत यावी.

४. आरोपींनी सी रिपोर्ट रजि. नं.२८१ प्रमाणे दिलेली दि.२२/०८/२०२३ रोजीची कॅश सिक्युरिटी ही अपिल कालावधीनंतर आरोपीस परत करण्यात यावी.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ ची पूर्तता म्हणुन वैयक्तिक जातमुचलका प्रत्येकी रुपये ५,०००/– चा पुढील सहा महिनेच्या कालावधीकरीता द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित)

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:43:26 +0530

**इचलकरंजी** **(डी. बी. साठे)**

**दिनांकः ०२/०७/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र.२,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर.**